आकाशवाणी मुंबई
राष्ट्रीय बातमीपत्र - दुपारी १.३० वाजता
१७ नोव्हेंबर २०२६ - मंगळवार

**ठळक बातम्या**

- आसियान देशांची एकजूट आणि हिंद प्रशांत महासागर क्षेत्रात शांतता, खुलेपणा आणि स्थैर्याची आवश्यकता असल्याचं प्रधानमंत्र्यांचं आसियान- भारत परिषदेत प्रतिपादन

- देशाचं बागायती उत्पादन यंदा ३ हजार ८६९ लाख टनांवर जाण्याचा अंदाज

- उत्तर प्रदेशात विशेष पुनरीक्षण मोहिमेअंतर्गत पहिली मतदार यादी जाहीर

**आणि**

- सॅफ अजिंक्यपद फुटबॉल स्पर्धेचा अंतिम सामना आज, भारत आणि पाकिस्तान संघादरम्यान बांग्लादेशात ढाका इथं रंगणार

<><><><><>

आसियान देशांची एकजूट आणि हिंद प्रशांत महासागर क्षेत्रात शांतता, खुलेपणा आणि स्थैर्याची आवश्यकता या मुद्द्यांवर प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी भर दिला आहे. फिलिपिन्सची राजधानी मनिला इथं २३ व्या आसियान-भारत शिखर परिषदेत आज ते बोलत होते...

**- - होल्ड- बाईट- प्रधानमंत्री - --**

आसियान - भारत दूरगामी नौवहन सहकार्य , स्पेस हॅकेथॉन, दुर्मीळ खनिजांबाबत सहकार्य या योजनांची माहिती प्रधानमंत्र्यांनी दिली. आसियान देशातल्या विद्यार्थ्यांना नालंदा विद्यापीठात शिष्यवृत्ती, तसंच आसियान पर्यटकांना भारतात शुल्कमुक्त व्हिसा देण्यात येईल अशा घोषणा त्यांनी यावेळी केल्या.

यावर्षीच्या आसियान गटाचा अध्यक्ष या नात्यानं फिलिपिन्सनं २३व्या आसियान - भारत आणि २१व्या पूर्व आशिया शिखर परिषदांचं आयोजन केलं आहे. या शिखर परिषदांमधे सहभागासाठी तिथं आलेल्या आसियान नेत्यांशी प्रधानमंत्री गाठी भेटी घेणार आहेत. या द्विपक्षीय भेटींमध्ये ते सर्वंकष धोरणात्मक भागीदारी आणखी दृढ करण्याबाबत तसंच सामायिक हिताच्या क्षेत्रात सहकार्य वाढवण्यासंदर्भात चर्चा करतील.

23 व्या आसियान -भारत शिखर परिषदेत सहभागी नेत्यांकडून आसियान-भारत 2026 ते 2030 च्या कृतीआराखड्यासह सर्वंकष धोरणात्मक भागीदारीच्या

अंमलबजावणीचा आढावा घेण्यात येणार आहे. तसंच उभयपक्षी सहकार्याची भविष्यातील दिशा या मुद्द्यावरही चर्चा करण्यात येईल. प्रधानमंत्री मोदी दोन दिवसांच्या दौऱ्यासाठी काल फिलिपीन्सची राजधानी मनिलामध्ये पोहोचले. फिलीपिन्सच्या माहिती आणि दळणवळण तंत्रज्ञान विभागाचे सचिव रॉबर्ट जोसेफ जे मॉंटेस डी क्लारो यांनी त्यांचं स्वागत केलं. मनिला इथल्या भारतीय समुदायाकडूनही त्यांचं उत्साहात स्वागत करण्यात आलं. प्रधानमंत्री मोदी यांच्या सन्मानार्थ फिलिपीनचे अध्यक्ष फर्डिनांड मार्कोस यांनी काल स्नेहभोजन आयोजित केलं होतं.

<><><><><>

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी आज फिलिपिनची राजधानी मनिला इथं खालसा दिवाण गुरुद्वाराला भेट देऊन गुरुद्वाराच्या पुनर्विकासाची पायाभरणी केली. यावेळी सिनेटर फ्रान्सिस जोसेफ एस्कुडेरो आणि मनिला शहराचे महापौर फ्रान्सिस्को इस्को मोरेनो यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते. खालसा दिवाण गुरुद्वारा हा फिलीपिनमधला सर्वात जुना गुरुद्वारा आहे.

<><><><><>

देशाचं बागायती उत्पादन २०२५- २६ या वर्षात ३ हजार ८६९ लाख टनावर जाण्याचा अंदाज असल्याची माहिती केंद्रीय कृषी मंत्री शिवराजसिंह चौहान यांनी दिली. या वर्षीच्या कृषी उत्पादनाचा तिसरा अंदाज आज कृषीमंत्र्यांनी नवी दिल्ली इथं प्रसिद्ध केला. गेल्या वर्षी पेक्षा हे उतापदन १६१ लाख टनांनी जास्त असल्याचं त्यांनी सांगितलं. बागायती पिकांच्या लागवडीखालचं क्षेत्र कमी झालं असूनही उत्पादनात वाढ होईल असा अंदाज आहे.

<><><><><>

केंद्रीय अर्थसंकल्प २०२७-२८ च्या पार्श्वभूमीवर नवी दिल्ली इथं आज केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी उत्पादन क्षेत्रातल्या तज्ज्ञ आणि उद्योजकांसोबत तिसरी अर्थसंकल्पपूर्व चर्चा केली. या बैठकीला आर्थिक व्यवहार विभाग, उद्योग आणि अंतर्गत व्यापार प्रोत्साहन विभाग, खाण मंत्रालय, कॉर्पोरेट व्यवहार मंत्रालयाचे सचिव तसंच मुख्य आर्थिक सल्लागार उपस्थित होते.

<><><><><>

केंद्रीय वाणिज्य आणि उद्योग मंत्री पियुष गोयल यांनी इजिप्तमध्ये कैरो इथे इन्फिनिटी एनर्जी या उर्जानिर्मिती संस्थेचे अध्यक्ष मोहम्मद इस्माईल मन्सूर यांची भेट घेतली. या भेटीत त्यांनी वाहन निर्मिती आणि इलेक्ट्रिक वाहनांसंबंधीच्या सहकार्यावर चर्चा केली.

<><><><><>

उदयोन्मुख संगीत कलाकारांचा शोध घेण्यासाठी आकाशवाणीने राष्ट्रीय पातळीवर एआयआर रायझिंग स्टार्स या विशेष संगीत मैफिलींचं आयोजन केलं आहे. त्याचा पहिला टप्पा आजपासून येत्या ३० नोव्हेंबरपर्यंत देशभरात २६ ठिकाणी आयोजित केला जाणार आहे. त्यामध्ये ३० वर्षांपर्यंत वयाच्या तरूण कलाकारांना भाग घेता येईल. आकाशवाणीच्या ९० व्या वर्धापन दिनानिमित्त हा उपक्रम राबवला जात आहे.

<><><><><>

उत्तरप्रदेशात विशेष पुनरिक्षण मोहिमेअंतर्गत पहिली मतदार यादी आज प्रसिद्ध झाली. ही यादी २०२७ साठीची असून आजपासून ते १६ डिसेंबर या एक महिन्याच्या कालावधीत यादीतल्या नोंदींबद्दल सूचना आणि हरकती स्वीकारल्या जातील अशी माहिती उत्तरप्रदेशच्या मुख्य निवडणूक अधिकाऱ्यांनी दिली. याच कालावधीत २१,२२,२८ आणि २९ नोव्हेंबरला राज्यात ठिकठिकाणी विशेष शिबिरं आयोजित केली आहेत. या तारखांना मतदानकेंद्रांवर बीएलओ १० ते ४ या वेळेत मतदारयांद्यांसह उपस्थित राहतील. नागरिकांनी आपले नाव मतदारयादीत असल्याची खात्री करुन घ्यावी . तसंच येताना आपले दोन पासपोर्ट आकाराचे फोटो तसंच आधार कार्ड, जन्मतारखेचा तसंच वास्तव्याचा पुरावा बरोबर ठेवावा. असं आवाहन त्यांनी केलं आहे. यादीत ६,७ आणि ८ क्रमांकाच्या अर्जांद्वारे नावे दाखल करता येतील तर मतदाराच्या तपशीलात दुरुस्ती किंवा नावे वगळणे यासाठीही पर्याय उपलब्ध आहे. हे अर्ज पुरेश्या प्रमाणात उपलब्ध असल्याचंही त्यांनी नमूद केलं आहे.

<><><><><>

मतदार याद्यांच्या विशेष सखोल पुनरीक्षणात वगळण्यात आलेल्या ३ कोटी अवैध आणि भारतीय नागरिक नसलेल्यांना मतदार यादीत समाविष्ट करण्यासाठीच काँग्रेस SIR प्रक्रियेला विरोध करत असल्याची टीका भाजप नेते आशिष शेलार यांनी केली आहे. ते आज मुंबईत झालेल्या वार्ताहर परिषदेत बोलत होते. एसआयआर बाबत जे ४८ प्रश्न विरोधक मांडत आहेत

याबाबत राहुल गांधी यांनी संसदेत चर्चा का उपस्थित केली नाही, असा प्रश्नही शेलार यांनी उपस्थित केला.

<><><><><><>

हाँगकाँग सुपर 500 बॅडमिंटन स्पर्धेत मिश्र दुहेरी प्रकारात भारताच्या ध्रुव कपिला आणि राधिका शर्मा या जोडीने मुख्य स्पर्धेच्या फेरीत आपलं स्थान निश्चित केलं. त्यांनी आज झालेल्या पात्रता फेरीत हाँगकाँगच्या यिंग कित चेंग आणि युएत यी ल्युंग या जोडीवर २१-१७, २१-१७ अशी मात केली. भारताच्या सात्विकसाईराज रांकिरेड्डी आणि चिराग शेट्टी या जोडीचा चीनी तैपेईच्या खेळाडूंसोबतचा आरंभीचा सामना आज रंगेल.

<><><><><><>

दक्षिण आशियाई फुटबॉल महासंघ - सॅफ अजिंक्यपद फुटबॉल स्पर्धेचा अंतिम सामना आज, भारत आणि पाकिस्तान संघादरम्यान बांग्लादेशात ढाका इथं खेळला जाणार आहे. भारताने या स्पर्धेचं विजेतेपद विक्रमी ९ वेळा पटकावलं असून, सलग तिसऱ्यांदा विजेतेपद मिळवून आणखी एक विक्रम नोंदवण्याची संधी भारताला आहे.

<><><><><><>

भारत आणि न्यूझीलंड यांच्यातील पहिला क्रिकेट कसोटी सामना येत्या गुरुवारी वेलिंग्टन इथं खेळला जाणार आहे. या सामन्यात सात फलंदाजांसह चार वेगवान गोलदांज घेऊन मैदानात उतरणार आहोत अशी माहिती भारतीय क्रिकेट संघाचे कर्णधार शुभमन गिल यांनी वार्ताहारांना दिली.

<><><><><><>

उत्तराखंडमध्ये गेल्या १२ तासांत झालेल्या दोन वेगवेगळ्या रस्ते अपघातांत १२ जणांचा मृत्यू झाला असून ३१ जण जखमी झाले आहेत. टिहरी जिल्ह्यातल्या गुलरजवळ आज पहाटे एक प्रवासी बस १०० मीटर खोल दरीत कोसळून झालेल्या अपघातात ८ जणांचा मृत्यू झाला, तर २५ जण जखमी झाले. रुद्रप्रयाग जिल्ह्यातल्या क्यूंजा खोऱ्यात काल रात्री एक वाहन खोल दरीत कोसळून झालेल्या अपघातात ४ जणांचा मृत्यू झाला तर ६ जण जखमी झाले.

राष्ट्रपती द्रौपदी मुर्मु आणि प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी उत्तराखंडच्या दुर्घटनेबद्दल दुःख व्यक्त केलं असून जखमींच्या प्रकृतीत लवकर सुधारणा व्हावी, अशी प्रार्थना केली आहे.

आकाशवाणी मुंबई
राष्ट्रीय बातमीपत्र - दुपारी १.३० वाजता
१७  नोव्हेंबर २०२६ - मंगळवार
//<><><><><><>//